**संक्षिप्त खटला क्र. ११७५/२०२५**
**निशाणी— ०३**

**श्री. ए.ए.बाबर, न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) यांचे न्यायालय,**
**बेलापूर, नवी मुंबई.**

**गुन्हयाचा तपशिल**

संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक. ११७५/२०२५ निशाणी— 3
सरकार —वि.— पन्नालाल बच्चेलाल गुप्ता

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : | ०९/११/२०२४ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | ०९/११/२०२४ |
| ३. | फिर्यादीचे संपुर्ण नाव व पत्ता | : | **महाराष्ट्र सरकार मार्फत**<br>पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन<br>वाशी, नवी मुंबई. |
| ४. | आरोपीचे संपुर्ण नाव व पत्ता | : | १) पन्नालाल बच्चेलाल गुप्ता .<br>४१ वर्षे, धंदा — अंडाभुर्जी विक्री<br>राहणार : घर नं ३३७, शर्मा पानवालाजवळ,<br>तुर्भे स्टोअर नवी मुंबई. |
| ५. | (अ) अपराधाचा तपशिल | : | |

तुम्ही दिनांक ०९/०१/२०२४ रोजी १९.३० वाजताचे दरम्यान ,सेक्टर १७, वाशी प्लाझा सोसायटीजवळील पुटपाथवर वाशी येथील उघडयावरती मोकळया जागेत हातगाडीवर गॅस शेगडी वरती पानीपुरी असुन विक्री करीत होता.नमुद इसमाल जाणीव असतांना देखील त्यांने सार्वजनिक फुटपाथवरती हातगाडी लावुन त्यावर पेटीस व पानीपुरी करण्याकरीता गॅस शेगडी सुरू करून ज्वालाग्राही सिलेंडर वापरून मानवी जिवन धोक्यात येईल किंवा कोणत्याही व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान होईल अपघ ाात होवून इजा होईल असे हयगईचे कृत्य करीत असतांना मिळून आलात व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिताचे कलम २८७ नुसार गून्हा केला आहे.

वरील गून्हयासंबंधी तपशील आरोपीला मराठी भाषेत वाचून व समजावून सांगीतला.

(श्री ए. ए. बाबर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०८, बेलापूर, नवी मुंबई.

बेलापूर
दिनांक : ०६/०१/२०२५

**आरोपीचा जवाब/म्हणणे**

| | | |
|---|---|---|
| प्रश्न १ | : | तुम्हाला पोलीसांनी दाखल केलेल्या खटल्याच्या प्रती मिळाल्या काय? |
| उत्तर | : | होय. |
| प्रश्न २ | : | तुम्हाला गून्हयाचा तपशील वाचून व समजावून सांगितला तो तुम्हाला समजला काय? |
| उत्तर | : | होय. |
| प्रश्न ३ | : | तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ? |
| उत्तर | : | मला गुन्हा कबूल आहे. |

**संक्षिप्त खटला क्र. ११७५/२०२५**
**निशाणी— ०३**

........Parmel Gupta
आरोपीची सही/अंगठा.

आरोपीस विचारणा केली असता आरोपीने स्वतः होवून व स्वईच्छेने गुन्हा कबुल करीत असल्याचे सांगितले. त्याबाबत आरोपीने पुर्सीस दाखल केली. आरोपी स्वतः होवून गुन्हा कबुल करीत असल्याचे दिसुन आल्यामुळे आरोपीची कबुली स्विकृत करण्यात येते.

Babar
( श्री ए. ए. बाबर )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०८, बेलापूर, नवी मुंबई.

बेलापूर
दिनांक : ०६/०२/२०२५

**न्यायनिर्णय**
**(दिनांक ०६/०२/२०२५ रोजी घोषित)**

१. वाशी पोलीस ठाणे यांनी गु.रजि.नं. ५६२/२०२४ बीएनएस कलम २८७ अन्वये आरोपीवर गुन्हा दाखल करून मा. न्यायालयात हजर केले आहे. सदरचा गुन्हा आरोपीस कबूल आहे. आरोपी कोणत्याही दाबावाखाली सदर गुन्हयाची कबूली देत नाही असे मान्य करत आहे. सदरच्या गुन्हयाची कबूली तो स्वइच्छेने देत आहे.

२. आरोपीने मा. न्यायालयास विनंती केली आहे की, तो त्याच्या कुटूंबाचा एकमेव कर्ता पुरुष असल्याने त्याला दया दाखविण्यात यावी व कमीत कमी दंडाची शिक्षा करण्यात यावी. तरी सदर गुन्हयाचे स्वरूप व आरोपीची विनंती पाहता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे:

**: आदेश :**

१. आरोपीस भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७५ नुसार शिक्षा देण्यात येत आहे. आरोपीस भा.दं.वि कलम २८७ नुसार सदर न्यायालय उठेपर्यंत व रूपये ५००/— (रुपये पाचशे रूपये फक्त) दंडाची शिक्षा करण्यात येते. दंड न भरल्यास आरोपीस ५ दिवसांची साधी कैद ही शिक्षा देण्यात येत आहे.
२. आरोपीने वरील सर्व शिक्षा एकत्ररित्या भोगावी.
३. सदर न्यायानिर्णयाची प्रत विनामुल्य आरोपीस देण्यात यावी.

Babar
( श्री ए. ए. बाबर )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०८, बेलापूर, नवी मुंबई.

बेलापूर
दिनांक :०६/०२/२०२५

(five Hundred only)
Fine Paid 500/-
Sr. Clerk, Civil Court,
Belapur, Navi Mumbai.
6/2/2025